संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालये/महाविद्यालये/संस्थांमधील अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः मुवाढ -२०१६/(३८/१६)/मशि-१
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२
दिनांक : ७ मार्च, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय क्र. असंक-१००४/प्र.क्र. १२ (भाग-२)/२००४/वित्तीय सुधारणा-१ दिनांक ०४.१०.२००४.
२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/२०१६-१७/उशि/पदांना मुदतवाढ/प्रशा-२/२२८४ दिनांक २४.०२.२०१६.
३) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. मुवाढ-२०१६/(३८/१६)/मशि-१ दिनांक १३.४.२०१६.
४) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. मुवाढ-२०१६/(३८/१६)/मशि-१ दिनांक १९.४.२०१६.
५) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. मुवाढ-२०१६/(३८/१६)/मशि-१ दिनांक ०६.८.२०१६.
६) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. मुवाढ-२०१६/(३८/१६)/मशि-१ दिनांक १०.१०.२०१६.
७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक १०.०२.२०१७.
८) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/२०१७/उशि/पदांना मुदतवाढ/प्रशा-२/२९४४ दिनांक ०७.३.२०१७.
९) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. मुवाढ-२०१६/(३८/१६)/मशि-१ दिनांक २४.३.२०१७.
१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आ.पु.क. दिनांक २९.६.२०१७.
११) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/२०१७/उशि/पदांना मुदतवाढ/प्रशा-२/१०८६९ दिनांक १३.९.२०१७.
१२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आ.पु.क. दिनांक ०३.१०.२०१७.
१३) शासन निर्णय क्र. मुवाढ-२०१६/(३८/१६)/मशि-१, दिनांक १३.१०.२०१७.
१४) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/२०१७-१८/अस्थायी पदे मुदतवाढ/प्रशा-२/१४१४६, दिनांक ८.१२.२०१७.
१५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ०८.०१.२०१८.
१६) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र. मुवाढ-२०१६/(३८/१६)/मशि-१, दिनांक १६.०१.२०१८
१७) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/२०१७-१८/अस्थायी पदे मुदतवाढ/प्रशा-२/२५०७ दिनांक २८.२.२०१८.
१८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दिनांक ०५.०३.२०१८

शासन निर्णयः-

संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व त्यांच्या अधिपत्याखालील विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांची कार्यालये, शासकीय महाविद्यालये/शासकीय विज्ञान संस्था/शासकीय न्याय सहाय्यक विज्ञान संस्था/ भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व परिक्षा प्रशिक्षण केंद्रे व शासकीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय वसतीगृहे, सावित्रीबाई फुले महिला छात्रालय, तेलंग स्मारक मुलींचे वसतीगृह, शासकीय वसतीगृहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीराव फुले व राजर्षि शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन

समिती, मुंबई यामध्ये एकूण १६४० पूर्णवेळ अस्थायी व ९४ अर्धवेळ अस्थायी पदे वरील संदर्भ क्र. १६ येथील शासन निर्णयान्वये दिनांक २८.२.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास मंजूरी देण्यात आली होती. तथापि, वित्त विभागाने त्यांच्या दिनांक ०५.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही, अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१८ ते दिनांक ३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यासाठीचे अधिकार प्रदान केले असल्याने, उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत खालील अस्थायी पदे दिनांक ०१.०३.२०१८ ते दिनांक ३०.०९.२०१८ पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे:-

अ.क्र.	विभागाचे नांव	एकूण पदे	
		पूर्णवेळ	अर्धवेळ
१	उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे	७७	०
२	सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई	४९८	५७
३	सहसंचालक, उच्च शिक्षण, पनवेल विभाग, पनवेल	६३	०४
४	सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे	४६	०
५	सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर	१०५	०९
६	सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर	२९	०
७	सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव विभाग, जळगांव	३७	०
८	सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद	२४०	०८
९	सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड	७२	०४
१०	सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती	२४१	०७
११	सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर	२३२	०५
	एकूण	**१६४०**	**९४**

२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यकक्षेतील १६४० पूर्णवेळ व ९४ अर्धवेळ या पदांच्या आस्थापनेवर होणारा खर्च २२०२-सर्वसाधारण शिक्षण या प्रधान शीर्षाखाली तसेच, यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले व राजर्षि शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई या तीन समितीवरील अस्थायी पदांच्या आस्थापनेवर होणारा खर्च मागणी क्र. डब्ल्यू ४, २२०५-कला व संस्कृती-८००-इतर खर्च (०१)-समित्या व समारंभ-(०१) (०१) समित्या व समारंभ (२२०५ ०४५८) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून मंजूर तरतुदीतुन भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या क्र. असंक-१००४/प्र.क्र. २/(भाग-२)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ०४ ऑक्टोबर, २००४ अन्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०७१४४९४०२३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manisha Pravin Kini

Digitally signed by Manisha Pravin Kini
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=108cbdac08c7e940866a8fc97bfe7f861bf192ce9dd6b4d0924623149a51f9ed, cn=Manisha Pravin Kini
Date: 2018.03.07 14:50:48 +05'30'

(म.प्र. किणी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

२. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर
४. लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई
५. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
६. जिल्हा कोषाधिकारी, पुणे/सोलापूर/कोल्हापूर/औरंगाबाद/नांदेड/परभणी/बीड/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/नागपूर/भंडारा/गडचिरोली/रत्नागिरी/रायगड
७. सर्व विभागीय सहसंचालक
८. प्राचार्य/संचालक, सर्व शासकीय कला, वाणिज्य, विज्ञा, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये/संस्था.
९. वसतीगृह प्रमुख, सर्व शासकीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय वसतीगृहे.
१०. अधिक्षक, शासकीय महाविद्यालये वसतीगृहे, मुंबई
११. अधिक्षक, सावित्रीबाई फुले महिला छात्रालय, तेलंग स्मारक वसतीगृह, मुंबई
१२. सदस्य सचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीराव फुले व राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती, शासकीय बॅरेक नं १८, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०० ०२१
१३. निवडनस्ती